# बृहन्मुंबई महानगरपालिका

## लोकमान्य टिळक महानगरपालिक सर्वसाधारण रुग्णालय, शिव – 22

क्र. एलटीएच/ 18388/रुप्र.
दिनांक: 22/08/2024

## <u>जाहिरातीचा नमुना</u>

लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व वैद्यकिय महाविद्यालय यांच्या आस्थापनेवरील 'प्रयोगशाळा सहाय्यक' संवर्गातील **रक्तपेढी विभागातील** 05 रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने (प्रत्येक 90 दिवसांच्या कालावधीनंतर 1 दिवसाचा खंड देवून) 6 महिन्याकरिता भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. विहित नमुन्यातील अर्ज जाहिराती सोबत जोडले असुन त्याची Print घेण्यात यावी.

सदर पदासाठी रुपये 710/- + 18% जीएसटी रु. 128/- = एकूण रु. 838/- इतके शुल्क लो.टि.म.स. रुग्णालयाच्या रोखपाल विभागात दि. 02/09/2024 ते दि. 13/09/2024 पर्यत कार्यालयीन वेळेत (शनिवार तसेच रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) सकाळी 11:00 ते दुपारी 3.00 वाजेपर्यत भरून, त्याची मूळ पावती अर्जासोबत जोडून अर्ज लो.टि.म.स.रुग्णालयाच्या आवक/जावक विभागात दि. 13/09/2024 पर्यंत सादर करावा. (दूरध्वनी क्रं. 022-24076381/ 24063000).

पदाचे नावः प्रयोगशाळा सहाय्यक – ठोक मानधन रु. 16,000/-
शैक्षणिक अर्हता –

1. उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाची रसायनशास्त्र (Chemistry) / सुक्ष्मजीवनशास्त्र (Microbiology) / जीवरसायनशास्त्र (Biochemistry) / जैविकतंत्रज्ञान (Biotechnology) या मुख्य विषयासह विज्ञान शाखेतील पदवी (Degree in B.Sc) उत्तीर्ण असावा.
2. उमेदवारास महानगरपालिकेच्या खात्यामार्फत घेण्यात येणारी व्यवसाय चाचणी (Trade test) परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
3. उमेदवारांना संगणकाचे ज्ञान अवगत करणे आवश्यक आहे. त्याने/तिने (डी.ओ.ई.ए.सी.सी.) सोसायटीचे (सी.सी.सी.) किंवा (ओ स्तर) किंवा (ए स्तर) किंवा (बी स्तर) किवा (सी स्तर) स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.
4. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा उच्चतम परिक्षेत किमान 50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्च स्तर किंवा निम्न स्तर) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**वयाची अट** : दि. 02/09/2024 पर्यंत वय १८ वर्षांपेक्षा कमी व ३८ वर्षांपेक्षा अधिक नसावे आणि मागासवर्गीयांकरीता 43 वर्षांपेक्षा अधिक नसावे.

1. उमेदवारांनी विवाहनोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला उमेदवार विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात. उमेदवाराने अर्जावर पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा व त्यावर त्याने उपलब्ध जागेत स्वाक्षरी करावी.
2. उमेदवाराने पदवी परीक्षा एकापेक्षा जास्त प्रयत्नांत उत्तीर्ण केली असल्यास ती परीक्षा किती प्रयत्नात उत्तीर्ण केली याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
3. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयात नैतिक अधःपतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.
4. निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
5. उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियुक्तीचे ना हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.
6. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवड प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.
7. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
8. निवड झालेल्या उमेदवारांस रुपये 500/- च्या बंधपत्रावर विहित नमुन्यातील कंत्राट करार करणे आवश्यक असून सदरहू खर्च संबंधित उमेदवारास करावा लागेल.
9. निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस स्टेशनकडून नेमणुकीनंतर एक महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक राहील.
10. सदर कंत्राटी तत्वावरील पदधारकांची नियुक्ती कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.
11. सदर कंत्राटी तत्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.
12. कुठल्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने 30 दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे.
13. कंत्राटी प्रयोगशाळा सहाय्यक यांस रु. 16,000/- एवढे निश्चित मानधन मिळेल. या मानधना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.

14. उपरोक्त पदाची कंत्राट तत्वावर नियुक्ती 90 दिवसांपेक्षा जास्त नाही, अशा प्रकारे करण्यात येईल. सदर कालावधीत नियमित तत्वावर प्रयोगशाळा सहाय्यक या संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्यात आल्यास, सदर कंत्राटी कर्मचा-याची नेमणूक / सेवा समाप्त करण्यात येईल.
15. उमेदवारास रक्तपेढी विभागात नियुक्त केलेल्या ठिकाणी किंवा वेळोवेळी वरिष्ठांच्या आदेशानुसार कामकाजाच्या <u>तीनही पाळयांमध्ये</u> काम करावे लागेल.
16. उमेदवारास नियुक्त केलेल्या विभागातील सत्रांनुसार साप्ताहिक रजा अनुज्ञेय असेल, त्या व्यतिरिक्त कंत्राटी कर्मचा-यांना लागू असणा-या प्रचलित नियमानुसार नैमितिक रजा अनुज्ञेय असतील.
17. त्यांची नेमणूक करार पध्दतीची असल्यामुळे त्यांना कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.
18. बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा नियमावलीनुसार ही नेमणूक झाली नसल्यामुळे त्या अनुषंगाने मिळणारे निंवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत.
19. ते दररोज त्यांच्या कर्तव्याच्या वेळेनुसार बायोमेट्रीक करतील व नियमाने हजेरी पटावर स्वाक्षरी करतील अन्यथा त्यांना गैरहजर धरण्यात येईल. त्यांची विना परवानगी गैरहजेरी विना वेतनी गैरहजेरी करण्यात येईल.

<u>विशेष सूचना –</u>

अ) यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले / प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ब) सविस्तर सूचना, याबाबतच्या अटी व शर्ती, मनपाच्या संकेतस्थळावर प्रसारित करण्यात आल्या आहेत. उमेदवारांनी त्याचे बारकाईने अवलोकन करुन संकेतस्थळावर प्रसारीत केलेल्या अर्जाच्या तसेच वैयक्तीक माहितीपत्राच्या नमुन्यामध्ये अर्ज करावा. अर्जाचे विहित शुल्क भरुन त्याची पावती जोडल्याशिवाय अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही.

क) टपालाने आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

सही/- 21.08.2024

श्री. दामोदर जाधव
कार्यकारी प्रशासक (प्रमुख रुग्णालये)
लो.टि.म.स. रुग्णालय, शीव

सही/- 21.08.2024

(डॉ. मोहन जोशी)
अधिष्ठाता
लो.टि.म.स. रुग्णालय, शीव

# बृहन्मुंबई महानगरपालिका

लो.टी.म.स वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई 400022
दूरध्वनी क्रं. – 022-24066381-89

## अर्जाचा नमुना

पदाचे नाव: ______________________________________

प्रति,
अधिष्ठाता,
लो.टी.म.स. वैद्यकीय महाविद्यालय व
सर्वसाधारण रूग्णालय, शीव,
मुंबई – 400022.

बृहन्मुंबई महानगरपालिकेत लो.टी.म. वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई 400 022 मध्ये ___________________________ पदाकरिता दिनांक ___________ च्या जाहिरातीनुसार मी खाली सही करणार विनंती अर्ज करत आहे. माझी सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे:

1) (अ) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) : ___________________________________________

________________________________________________________________________

____________________________________________________________________

2) पत्ता (कायमचा) :________________________________________________________

______________________________________________________________________

______________________________________________________________________

3) पत्ता (पत्रव्यवहाराचा) :___________________________________________________

______________________________________________________________________

______________________________________________________________________

4) पदाचे नाव __________________________

5) जन्म दिनांक: _________________________________

6) वजन: __________________ किलो उंची: _____________________ सें.मी.

7) वय: _______________

8) शैक्षणिक अर्हता: _________________________________________________________

मी यान्वयेप्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांवर व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे.

त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास माझी काहीही तक्रार राहणार नाही.

सोबत : प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रति

आपला / आपली विश्वासू,

अर्जदाराची सही
(अर्जदाराचे नाव)

दिनांक:

बृहन्मुंबई महानगरपालिका
लो.टी.म.स. वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई 400022
दूरध्वनी क्रं. - 0224063081-89

## वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA)

1) संपूर्ण नाव (आडनांव प्रथम) मराठीत: ____________________

2) वडिलांचे संपूर्ण नाव: ____________________

3) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरिता): ____________________

4) पत्ता, दूरध्वनी क्रमांक व इमेल आयडी:

____________________

____________________

5) लिंग- पुरुष ____________ स्त्री ____________

6) जन्मदिनांक: दिनांक__________ महिना________ वर्ष ________

दिनांक ____________ रोजी असलेले वय ________ महिने ________ दिवस_____

7) शैक्षणिक अर्हता:

| शैक्षणिक अर्हता | शालांत परीक्षा मंडळ/विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | | उच्च माध्यमिक शालांत परीक्षेतील गुण | | उमेदवार किती प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण झाला |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | टक्केवारी | मराठी | इंग्रजी | |
| दहावी | | | | | | | |
| बारावी | | | | | | | |
| पदवी | | | | | | | |
| पदविका | | | | | | | |
| पदव्युत्तर | | | | | | | |

8) अनुभव: ____________________

9) स्थानिक पोलीस ठाण्याचा पूर्ण पत्ता: ____________________

____________________

10) उंची: ____ फूट ___ इंच, वजन: ______ कि.ग्रा., शरीराची ठेवण: किरकोळ / मध्यम /

सुदृढ वर्ण: ________ नेत्र वर्ण: ________ वैयक्तिक खूण: ____________

11) संगणकविषयक ज्ञान: MS-CIT किंवा शासनाने विहित

केलेल्या संगणक विषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र: आहे / नाही

12) उमेदवार सध्या नोकरी करीत आहे किंवा नाही ? होय / नाही

असल्यास त्याबाबतचा तपशील:

13) उमेदवाराविरुद्ध पोलीस चौकशी / न्यायालयिन प्रकरण प्रलंबित / प्रस्तावित आहे का ? असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा. होय / नाही

14) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? शिक्षा झाली असल्यास, शिक्षेचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी. होय / नाही

आपला / आपली विश्वासू,

अर्जदाराची सही
(अर्जदाराचे नाव)

दिनांक: